पोलीस अधिक्षक कार्यालय,धुळे
दिनांक १२ जुलै २०१६

## प्रेस नोट

## विशेष मोहिमे अंतर्गत मोटर वाहन कायदया नुसार धुळे जिल्हा पोलीसांची कारवाई

दिनांक १२ जुलै २०१६

मा विशेष पोलीस महानिरीक्षक साहेब ,नाशिक परीक्षेत्र,नाशिक यांचे आदेशानुसार व मा. पोलीस अधिक्षक श्री. चैतन्या एस्. सो. यांचे मार्गदर्शनाखाली धुळे जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन तसेच सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे पथक व शहर वाहतुक विभाग यांनी दि. १ जुन २०१६ ते ३० जुन २०१६ या कालावधीत आयोजित विशेष मोहीमे दरम्यान मोटार वाहन कायद्यातंर्गत विविध केसेस केल्या आहेत त्यापैकी

संपुर्ण जिल्हयात अवैध प्रवासी वाहतुकीच्या १२६४ केसेस करण्यात आल्या असुन त्यात सदर वाहन चालकांकडुन १२,६३,८०० रूपये दंड वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात आला आहे.त्यापैकी न्यायालयात ६९२ केसेस पाठविल्या होत्या तसेच अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांचे परवाना निलंबन कारवाईसाठी एकुण ९४ प्रस्ताव पाठविण्यात आले होते त्यापैकी २८ वाहनांचे परवाने निलंबीत करण्यात आले आहेत.

तसेच ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह (दारु पिउन वाहन चालविणे) या अंतर्गत ,दुकाची ,चार चाकी व इतर वाहन चालकांवर एकुण २६८ केसेस करण्यात आल्या आहेत. हयामध्ये वाहन चालकांकडुन ३,७८,५०० रूपये दंड वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात आला आहे.

तसेच इतर केसेस मध्ये टेललॅम्प नसणे, रॉग साईड वाहन चालविणे, सिटबेल्ट न लावणे, हेल्डमेट न घालता वाहन चालविणे, रॉंग साईड वाहन पार्कीग करणे , ट्रिपल सीट वाहन चालविणे, वाहनाला नंबर प्लेट नसणे, ॲटो रिक्षामध्ये फ्रंट सिट वाहन चालविणे, ओव्हरसिट वाहन चालविणे अशा ,दुकाची ,चार चाकी व इतर वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यातंर्गत एकुण १०,९१७ केसेस केलेल्या आहेत व सदर वाहन चालकांकडुन १०,९१,७०० रूपये दंड वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात आला आहे.

तरी सदर कारवाई बददल मा. पोलीस अधिक्षक श्री. चैतन्या एस्. सो.यांनी सर्व पोलीस स्टेशन अधिकारी /कर्मचारी , सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे पथकाचे कर्मचारी व शहर वाहतुक विभाग यांचे अभिनंदन केले असुन हयानंतर सुदधा सदर कारवाई चालु राहणार असल्याचे सांगितले आहे.